**रयत शिक्षण संस्थेचे,**

**डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)**

**ता. पलूस, जि. सांगली**



भूगोल विभाग दिनांक: ०६ /०३/ २०२१

"पर्यावरणाचा शाश्वत विकास"

**अहवाल**

महाविद्यालयात भूगोल विभाग आणि विवेक वाहिनी यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ०६/०३/२०२१ रोजी सकाळी ठीक ०९.३० वाजता "पर्यावरणाचा शाश्वत विकास" या विषयावर प्रा. डॉ. कांबळे, भूगोल विभाग, एन. सी. सी. प्रमुख, आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पलुस (जि.सांगली) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. प्राचार्य डॉ. कदम एल. डी. यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये नैसर्गिक पर्यावरण, साधन संपत्ति आणि तिचे संवर्धन यातून पर्यावरणाचा शाश्वत विकास कसा साधता येईल हे संगितले. पर्यावरणाचा शाश्वत विकास ही काळाची गरज आहे. या नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन केले नाही तर येत्या ४० वर्षामध्ये खनिज संपत्ति संपतील तर हवा, पाणी, जमीन यांचा दर्जा घसरत चाललेला आहे. त्यांच्यामधील प्रदूषणात वाढ होत आहे. या कधीही न संपणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत विकास अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा भविष्यामध्ये मानवा समोर अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. वृक्षारोपण ही काळाची गरज आहे असे विचार त्यांनी मांडले. तर सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. कदम एल. डी. यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून पर्यावरणाचे संतुलन, परिसंस्था, नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन आणि पर्यावरणाच विकास यावर आपले विचार व्यक्त केले.

कार्यकर्माचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. खाडे ए. एस. यांनी केले. कार्यक्रमाच्या पाहुण्यांची ओळख प्रा. कोने डी. एम. यांनी करून दिली. तर सूत्र संचालन प्रा. मस्के एस. ए. यांनी केले. कार्यक्रमाचे आभार हिन्दी विभाग प्रमुख डॉ. भोसले के. बी. यांनी मांडले. या कार्यक्रमाचे संयोजन आणि नियोजन भूगोल विभागाचे प्रा. वाघमारे आर. व्ही. यांनी केले.

**निष्पत्ती** **लाभार्थी संख्या :** ७६

- विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण झाली .
- विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाचा शास्वत विकास ही संकल्पना संप्रेरित झाली

- **भूगोल विभाग** **दिनांक: ०६ /०३/ २०२१**

"पर्यावरणाचा शाश्वत विकास"




प्रमुख पाहुणे व मा.प्राचार्य प्रतिमा पूजन करताना




प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करताना मा.प्राचार्य डॉ. कदम एल.



प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.कांबळे एस.एम. आपले विचार व्यक्त करताना



मा.प्राचार्य डॉ. कदम एल. डी. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना

विभाग प्रमुख

भूगोल विभाग

प्राचार्य,

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)